


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २९
www.ramprahar.com

गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांचे धाबे दणाणले'/२
अलिबाग चौलमधील रस्ता झाला सुसाट/५
दुलीप ट्रॉफिसाठी चार संघ लढणार/८

# मुख्यमंत्रिपदाऐवजी चुकांचे आत्मपरीक्षण करावे!

## ■ पृथ्वीराज चव्हाणांचा दिल्ली दौऱ्यावरून उद्धव ठाकरेंना टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी उद्धव ठाकरेंनी केलेल्या दिल्ली दौऱ्यावर त्यांना टोला मारला आहे. ते म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदाऐवजी चुकांचे आत्मपरीक्षण केले पाहिजे.

महाराष्ट्राची एक परंपरा आहे की विरोधी पक्षाची आघाडी असते तेव्हा काँग्रेस कधीही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करत नाही. हे महाराष्ट्रातच नाही तर इतर राज्यांमध्येही आहे. मुख्यमंत्री जर स्वतः निवडणुकीत उतरले तर गोष्ट वेगळी असते. काँग्रेसची परंपरा आहे की निवडणूक झाल्यानंतर जो सर्वांत मोठा पक्ष असतो त्या पक्षाचा मुख्यमंत्री होतो. आता उद्धव ठाकरेंना का गरज वाटली? की आपण जाऊन मुख्यमंत्रिपदाचे शिक्कामोर्तब करून यावं? लोकसभेला उद्धव ठाकरेंच्या पक्षाचा परफॉर्मन्स समाधानकारक नव्हता. त्यांनी काय चुका झाल्या त्याचे आत्मपरीक्षण करावे. काँग्रेसमध्ये आता त्यांची ही मागणी कुणी ते मान्य करणार नाही. सहानुभूतीचा विषय आता संपला आहे, असे पृथ्वीराज चव्हाण या वेळी म्हणाले.

## खारघरमध्ये आज १११९ फुट तिरंगा पदयात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या वतीने रायगड जिल्ह्यातील पनवेलमधील खारघर येथे सर्वांत मोठी 'भव्य दिव्य १११९ फुट तिरंगा पदयात्रा' होणार आहे.

खारघरमधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ते उत्सव चौक अशा मार्गाने स्वातंत्र्य दिनानिमित्त गुरुवारी (दि. १५) सकाळी १० वाजता या भव्य दिव्य तिरंगा यात्रेला प्रारंभ होणार आहे. पदयात्रेत अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून अविस्मरणीय अनुभव आणि देशभक्तीच्या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

## 'वाढवण'च्या जोड रस्त्याला केंद्राची मंजुरी

**उरण :** केंद्रीय मंत्रिमंडळाने एन.एच. ४८ पासून सुमारे ३२ किमी लांबीच्या वाढवण बंदरापर्यंतच्या जोडरस्त्याला मंजुरी दिली आहे. याशिवाय संबंधित निर्णय घेण्यासाठी मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांना या संदर्भात योग्य ते निर्णय घेण्याचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. **(सविस्तर २ वर..)**



## विद्यार्थ्यांची प्रगती बघून अत्यानंद –परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत**

विद्यार्थ्यांची प्रगती बघून अत्यानंद झाल्याची भावना महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी बुधवारी (दि. १४) व्यक्त केली.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात माजी विद्यार्थी मंडळ आणि संजीवन मार्ग यांच्या वतीने आयोजित केलेल्या व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण नुकतेच झाले. **(पान २ वर..)**















# केंद्रीय मंत्रिमंडळाची वाढवण जोडरस्त्याला मंजुरी

## तवा जंक्शन ते वाढवण बंदरापर्यंत राष्ट्रीय महामार्गाची घोषणा

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

केंद्रीय मंत्रिमंडळाने एन.एच. ४८पासून सुमारे ३२ किमी लांबीच्या वाढवण बंदरापर्यंतच्या जोडरस्त्याला मंजुरी दिली आहे. संबंधित निर्णय घेण्यासाठी मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांना यासंदर्भात योग्य ते निर्णय घेण्याचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत.

भारतीय राष्ट्रीय, राज्यमार्ग प्राधिकरणाच्या भूसंपादन समितीने संरेखन मंजूर केले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केल्यानंतर जमीन संपादनासाठी अधिसूचना लागू होईल. भारत सरकारने १२ ऑगस्ट २०२४ रोजी गॅजेट नोटिफिकेशन काढून तवा जंक्शन ते वाढवण बंदरापर्यंतच्या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केले आहे.

वाढवण बंदराच्या महत्त्वाच्या विकासाबाबत जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ म्हणाले, वाढवण बंदरातील काम सुरू करण्यासाठी रस्त्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे. बंदरापर्यंत उत्खनन सामग्रीची वाहतूक करण्यासाठी हा महामार्ग आवश्यक आहे, कारण अशा अवजड वाहतुकीसाठी स्थानिक रस्ते अरूंद आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने या रस्त्याला राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केल्यामुळे या प्रक्रियेला विलक्षण गती मिळेल.

ते पुढे म्हणाले, एकदा राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने अधिसूचना जारी केल्यानंतर, भूसंपादन प्रक्रिया त्वरित सुरू होईल. त्याच बरोबर, साहित्य वाहतूक सुलभ करण्यासाठी प्राधिकरण अंदाजे २० किमी लांबीच्या दोन लेन रस्त्याच्या बांधकामासाठी निविदा मागवेल. हा रस्तादेखील वाढवण बंदराच्या कनेक्टिव्हिटीचाच एक भाग असेल तसेच आवश्यकतेनुसार या रस्त्याचा विस्तार करण्याची योजना आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने जून २०२४ मध्ये वाढवण बंदर प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर, वाढवण किनारपट्टीच्या ऑफशोअर भागात बांधकाम, ड्रेजिंग आणि पुनर्वसनाद्वारे तयार केल्या जाणाऱ्या जमिनीचा विकास आणि देखभाल करण्यासाठी अभिरुची पत्र (एजख) मागविले असून अनेक प्रमुख संस्थांनी यात स्वारस्य दाखवले आहे. या महामार्गाचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर पुढील पावसाळ्यानंतर बंदराचे बांधकाम सुरू होणे अपेक्षित आहे.

# लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांचे धाबे दणाणलेत -खासदार श्रीरंग बारणे



**कर्जत : प्रतिनिधी**

आपण काहीच करायचे नाही पण दुसऱ्यांनी काही चांगले केले तर टीका करण्याचा कोणताही अधिकार नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. या योजनेत १७ ऑगस्ट रोजी पुण्यात जाहीर कार्यक्रमात राज्यातील एक कोटी ४७ लाख महिला पहिल्या यादीत पात्र ठरल्या आहेत. अशा अनेक योजना राज्यातील अनेक राज्यकर्त्यांनी राबविल्या आहेत. आमचा भाऊ राज्याचा मुख्यमंत्री आहे आणि त्यांनी बहिणीला महिन्याला मदत करण्याचे धोरण घेतले तर तुमच्या पोटात दुखण्याचे कारण काय? आमचा मुख्यमंत्री घरी बसून काम करीत नाही तर १८ तास राज्य सुरळीत चालावे असे कार्य करीत आहे. राज्य चालविण्याची ठोस भूमिका एकनाथ शिंदे यांच्या कामामुळे पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार आहे, असा विश्वास खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला.

कर्जत येथील शेळके मंगल कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सन्मान यात्रेनिमित्त सभा आयोजित केली होती. या वेळी शिवसेना नेत्या मीना कांबळी, आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना उपनेत्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख डॉ. शिल्पा देशमुख, मावळ संपर्क प्रमुख नम्रता भोसले, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर, जिल्हा संपर्क प्रमुख विजय पाटील, महिला आघाडी जिल्हा प्रमुख नीलम चोरगे, जिल्हा सल्लागार संघटक सुरेखा शितोळे तसेच मीना महेंद्र थोरवे, मनीषा थोरवे, मनीषा भासे, महिला तालुका प्रमुख रेश्मा म्हात्रे, जिल्हा परिषद माजी सदस्य सहारा कोळंबे, मनीषा दळवी आदी उपस्थित होते. सुरेखा शितोळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शिवसेना महिला आघाडी कर्जत शहर संघटक सायली शहासने यांनी प्रास्ताविक केले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरण करण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. माझी लाडकी बहीण ही योजना तळागाळातील महिला यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना केली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महिलांपर्यंत पोहचवण्यासाठी शिवसेना महिला आघाडी राज्यभर फिरत आहोत. महिलांना १५०० रुपयांचे अनुदान ही भीक आहे असा आरोप विरोधक करीत



आहेत. मग तुम्ही अडीच वर्षे घरात बसून फेसबुकवरून दिसत होता. त्या वेळी मंत्री असलेले एकनाथ शिंदे हे दोन वेळा कोरोना होऊनदेखील राज्य फिरण्याचे थांबले नाहीत. जनतेचे हित पाहणारा मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे राज्यभर फिरत असून अठरा - अठरा तास जनसेवेचे काम करीत आहेत, असे मीना कांबळी यांनी केले.

शिवसेना पक्षप्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी, आता तुम्ही साध्या महिला नाहीत, तुम्ही आता मुख्यमंत्र्याच्या भगिनी आहेत, असे सांगितले. महिला आघाडी संपर्क प्रमुख नम्रता भोसले यांनी लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांच्या पायाखलील वाळू सरकली आहे, असा आरोप केला. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.

# खालापुरात महिलेच्या धाडसाने अत्याचाराचा प्रयत्न फसला

**खोपोली : प्रतिनिधी**

एकट्या महिलेला गाठून तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्या परप्रांतीयाला महिलेने केलेल्या धाडसी प्रतिकारामुळे मोठा अनर्थ टळला. पोलिसांनी काही वेळातच आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

फुडमॉल येथे कामाला असलेल्या २५ वर्षे विवाहिता मंगळवारी (दि.१३) सायंकाळी ५.१५ वा. कामावरून सुटल्यानंतर घरी निघाली होती. त्याच परिसरात दबा धरून बसलेला अनोळखी इसमाने पीडितेच्या पाठीमागून येऊन तोंड दाबून, रस्त्याचे खाली झाडीमध्ये जबरदस्तीने फरफटत नेले. पीडितेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करीत असताना ती ओरडू लागल्याने आरोपीने तिचा गळा दाबून धरून त्यांना जिवे ठार मारण्याचादेखील प्रयत्न केला. पीडितेने हिंमत करून आरोपीच्या चेहऱ्यावर ओरबाडून स्वतःची सुटका केली. झटापटीत आरोपीच्या तोंडावर नखाचे ओरखडे पडून रक्त आल्याने त्यांनी पळ काढला. घाबरलेल्या पीडितेन याबाबत आपल्या पतीला माहिती दिली असता खोपोली पोलीस ठाण्यात याबाबत माहिती देण्यात आली. खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पोलीस पथक घटनास्थळी हजर झाले. परिसरातील सीसीटीव्ही तपासून आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात झाली. पीडितेने केलेल्या वर्णनाशी साधर्म्य असलेली व्यक्ती फूड मॉलपासून काही अंतरावर ढाब्यावर बसलेली पोलिसांना आढळली.

पोलिसांनी सदर व्यक्तीच्या चेहऱ्यावरील जखमांविषयी विचारले असता तो व्यवस्थित माहिती देऊ शकला नाही. पोलिसांनी ताब्यात घेऊन चौदावे रत्न दाखवले असता त्यांनी केलेल्या कृत्याची कबुली दिली. आरोपी हा टँकरवर क्लीनर असून नशेमध्ये त्याने अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आरोपी परप्रांतीय असून मध्य प्रदेशातील आहे. आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि सुजित गडदे करीत आहेत.

## अभिजीत शिवथरे रायगडचे नवे अप्पर पोलीस अधीक्षक

**अलिबाग** : अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचा प्रशासकीय कालावधी पूर्ण झाल्याने बदली करण्यात आली आहे. अभिजीत शिवथरे रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक असणार आहेत.

लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून अतुल झेंडे यांनी नावलौकीक कमावला होता. त्यांची ठाणे पोलीस आयुक्तालयात बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागेवर अभिजीत शिवथरे रायगडच्या अप्पर पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्विकारणार आहेत. अभिजीत शिवथरे, पोलीस महासंचालक कार्यालयात सहाय्यक पोलीस महानिरीक्षक म्हणून कायदा व सुव्यवस्था विभाग महाराष्ट्र राज्य या विभागाचा कार्यरत होते.

# मुंबईत वर्सोवा बीचवर कारने दोघांना चिरडले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत आणखी हिट अँड रनची घटना घडली आहे. मुंबईच्या वर्सोवा समुद्रकिनाऱ्यावर झोपलेल्या दोघांना एसयूव्ही अलिशान कारने चिरडले. यातील एका ३६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला, तर दुसरा एकजण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना सोमवारी (दि.१२) पहाटे घडली.

रिक्षाचालक गणेश यादव आणि बबलू श्रीवास्तव अशी दोघांची नावे आहेत. हे दोघेजण शहरातील उष्ण आणि दमट वातावरणातून थंडावा मिळावा म्हणून वर्सोवा समुद्रकिनारी झोपले होते, पण त्यांना अलिशान कारने चिरडले. या घटनेत श्रीवास्तव यांच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे तो बेशुद्ध पडला होता. या घटनेनंतर कार चालक आणि त्याचा मित्र कारमधून बाहेर आले, पण दोघे गंभीर जखमी झाल्याचे आणि लोक जमा होऊ लागल्याचे पाहून त्यांनी कारमधून घटनास्थळावरून पळ काढला, असे पोलिसांनी सांगितले.

**दोघांविरोधात गुन्हा दाखल**

त्यानंतर बबलू श्रीवास्तव आणि गणेश यादव यांना तातडीने शहरातील कूपर रुग्णालयात नेण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डोक्यावर आणि हाताला जोरदार मार लागल्याने श्रीवास्तव अचानक जागा झाला. त्यानंतर त्याला एक कार त्यांच्या शेजारी झोपलेल्या गणेशच्या अंगावरून जाताना दिसली.

याप्रकरणी कारचालक निखिल जावळे (३४) आणि त्याचा मित्र शुभम डोंगरे (३३) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्यांना सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्याखाली अटक केली आहे. त्यांना स्थानिक न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

या घटनेच्या वेळी ते दारूच्या नशेत होते की, नाही हे तपासण्यासाठी पोलिसांनी त्यांच्या रक्ताचे नमुनेही तपासणीसाठी पाठवले आहेत.

# सूक्ष्म व लघुउद्योजकांनी योजनांचा लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहरवृत्त**

सूक्ष्म व लघुउद्योजकांकरिता शासनाच्या विविध योजना असून या योजनांचा लाभ जिल्ह्यातील सूक्ष्म व लघुउद्योजकांनी घ्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे दिले. महसूल पंधरवडानिमित्त जिल्हा उद्योग केंद्र येथे मत्स्यप्रक्रियेवर आधारित (सोलर ड्रायर) व कोकण बांबू कला केंद्र कल्स्टर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यशाळेकरिता उद्योग केंद्राचे महाव्यवस्थाक जी. एस. हरळया, बांबू कल्स्टरचे संचालक जामकर, एमसीईडीचे प्रकल्प संचालक आनंद विद्यागर उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, जिल्ह्यातील सूक्ष्म व लघु उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करण्याकरिता जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, तसेच पुढील शासकीय कार्यक्रमात येथील बांबू उत्पादकांनी तयार केलेल्या हत्याराची भेटवस्तू म्हणून देण्यात येईल. मत्स्यप्रक्रिया उद्योजकांना



जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात क्षमता असून या उद्योजकांना सोलार ड्रायरसारख्या यंत्रसामुग्रीची जोड शासकीय योजनांद्वारे देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. या वेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी उद्योजकांनी उभारलेल्या स्टॉल भेट देऊन माहिती घेतली.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी आपल्या प्रास्ताविकात बांबू कल्स्टर मत्स्यप्रक्रिया उद्योगाचे प्रात्यक्षिक व सोलार ड्रायरच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेकरिता महिला तसेच नवउद्योजक उपस्थित होते.

# ओरियन मॉलमध्ये इंडिया गेटची हुबेहूब प्रतिमा

**खारघर, पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

दरवर्षी स्वातंत्र दिनानिमित्त पनवेलमध्ये देशप्रेम जागृत करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम तसेच कलाकृती उभारल्या जात असतात. यावर्षीदेखील पनवेलमधील ओरायन मॉलमध्ये इंडिया गेटची हुबेहूब कलाकृती उभारण्यात आली आहे.

राष्ट्रध्वजाच्या तीन रंगाची छटादेखील या कलाकृतीवर उमटविण्यात आली आहे. या इंडिया गेटवर राफेलसारखी युद्ध विमाने घिरट्या घालत असल्याचे या देखाव्यात दाखविण्यात आले असून शासनाच्या घर घर तिरंगा उपक्रमाचे प्रचारदेखील याठिकाणी करण्यात येत आहे.

या वेळी पनवेल महापालिकेच्या वतीने काही विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करीत घरोघरी तिरंगा लावण्याचे आवाहन करण्यात आले. यापूर्वी ओरियन मॉलच्या वतीने आयएनएस विक्रांत या युद्धनौकेची प्रतिमादेखील उभारण्यात आली होती. या सुंदर कलाकृतीची दखल घेत शासनाच्या सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या वतीने थेट मंत्रालयात विक्रांतच्या कलाकृतीचे प्रदर्शन भरवले होते.

नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्यासाठी दरवर्षी ओरियन मॉलचे मालक मंगेश परूळेकर, मनन परूळेकर, दिलीप करेलिया विविध उपक्रम राबवत असतात. स्वातंत्र दिनानिमित्त उभारलेले इंडिया गेटची कलाकृती पाहण्यासाठी नागरिकांनी मॉलला भेट देण्याचे आवाहन मंगेश परुळेकर यांनी केले आहे.



## राज्यात पावसाचा जोर पुन्हा वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील दोन आठवड्यांपासून पावसाने उघडीप घेतली आहे. दरम्यान येत्या चार ते पाच दिवसांत पुन्हा एकदा राज्यातील अनेक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या संदर्भातील माहिती पुणे हवामान विभागाचे विभागप्रमुख डॉ. के एस. होसाळीकर यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून दिली आहे.

डॉ. होसाळीकर यांनी म्हटले आहे की, पुढील चार ते पाच दिवसांत महाराष्ट्रातील काही भागात हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे, तर तुरळक ठिकाणी विजांच्या गडगडाटांसह पावसाची शक्यता देखील भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रात १ ते १४ ऑगस्ट या कालावधीत शून्य टक्के पाऊस झाला आहे, तर येत्या आठवडाभरात पुन्हा एकदा पावसाला सुरुवात होणार असून, बहुतांश जिल्ह्यांत अतिवृष्टीचे संकेत आहेत, असेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

## विद्यार्थ्यांची प्रगती बघून अत्यानंद -परेश ठाकूर

जुलै महिन्यात सुरू झालेल्या या प्रशिक्षणाची नुकतीच सांगता झाली. हा सांगता समारंभ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे विद्यमान अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाला. या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, संजीवन मार्गचे संस्थापक अध्यक्ष संजीवन म्हात्रे, सूर्यकांत ठाकूर, आर.सी. म्हात्रे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, मिथिलेश वहुजे, उपप्राचार्य उल्का धुरी, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ.नामदेव पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

संजीवन म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रगतीचा राजमार्ग सापडल्याचे सूतोवाच केले. संजीवन म्हात्रे यांनीही व्यक्तिमत्वाला आकार देण्याची अमूल्य संधी मिळाल्याचे मत मांडले. तर परेश ठाकूर यांनी आपण स्वतःला व्यक्त करत नाही तोपर्यंत सामाजिक स्तरांवर आपल्याला न्याय मिळणार नाही, असे मत व्यक्त केले.



# गव्हाण विद्यालयात सलग दुसऱ्या दिवशीही 'हर घर तिरंगा' अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये हर घर तिरंगा अभियान संपूर्ण देशभरात जल्लोषात साजरे केले जात असून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तु.ना. घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स या दोन्ही विद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात बुधवारी (दि.१४) सलग दुसऱ्या दिवशी तिरंगा ध्वज फडकावून या अभिनयात उत्साहाने



सहभाग नोंदविण्यात आला.

या वेळी मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, उपशिक्षक अविनाश कजबजे, किरण कुऱ्हाडे, पावसकर तसेच गव्हाण विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर,सागर रंधवे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, राजेंद्र चौधरी, माणिक घरत, उमेश पाटील, राजू खेडकर, शितलकुमार म्हात्रे, प्रमोद करावकर, प्रशांत परदेशी, कलाशिक्षक गणेश भोईर, विद्यालयाचे माजी क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, द्रौपदी वर्तक, योगिता पाटील, जयवंती ठाकूर, अर्चना पाटील, चारुशीला ठाकूर, एच.आर. पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव डंपरची पुढे जाणाऱ्या मोटरसायकलला पाठीमागून धडक बसल्याने झालेल्या अपघातात मोटरसायकलवरील महिला गंभीररित्या जखमी होऊन मयत झाली. तिचे पती जखमी झाले आहेत. पनवेलजवळील चिखला फाटा बस स्टॉपजवळ जुने मुंबई-पुणे हायवेवर मोटरसायकलवरून धनाजी पाटील हे त्यांची पत्नी दमयंती उर्फ लता धनाजी पाटील (वय ५३ रा.बोर्ले) हे घरी चालले होते. या वेळी पाठीमागून आलेल्या डंपरची त्यांना जोरदार धडक बसली. झालेल्या अपघातात धनाजी पाटील हे गंभीर जखमी झाले असून त्यांची पत्नी या गंभीररित्या जखमी होवून मयत झाल्या आहेत. या अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस निरीक्षक अंकुर शेलार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### धोकादायक ड्रेनेजची डागडुजी



**पनवेल :** प्रभाग १८ मधील ठाणा नाका रोड, स्वामी नित्यानंद मार्ग आणि कै रत्नाकर खरे मार्ग (अमरधाम ते स्वा. सावरकर चौक) या तिन्ही मुख्य मार्गांवर अनेक ठिकाणी ड्रेनेज झाकणाच्या बाजूला सिमेंट निघाल्यामुळे खड्डे तयार झाले होते. त्यामुळे अनेकवेळा दुचाकीचे चाक अडकून अपघात झाले होते तसेच वाहतुकीस या खड्ड्यांमुळे अडथळा निर्माण होत होता. या बाबत माजी नगरसेवक विक्रांत पाटील यांनी दखल घेत महापालिकेला पत्र दिले. त्याची दखल घेत महापालिकेच्या वतीने स्वामी नित्यानंद मार्गावरील तुटलेले ड्रेनेज झाकण तसेच ड्रेनेज झाकणाच्या भोवती निर्माण झालेले खड्डे भरून घेण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

### ज्येष्ठ नागरिकांना मोफत देवदर्शन

**उरण :** ज्येष्ठ नागरिकांचे जाण्या येण्याचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना चांगली तीर्थस्थळे बघता यावीत, ज्येष्ठ नागरिकांचा पैसा व वेळेची बचत व्हावी, त्यांना उतार वयात देव दर्शनाचा लाभ मिळावा या अनुषंगाने चिरले उरण येथील आर्यन ग्रुप तर्फे ८ ते १२ ऑगस्ट २०२४ दरम्यान मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी आर्यन ग्रुप तर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी मोफत देवदर्शन यात्रा मोठ्या उत्साहात झाली. एकूण २००हुन अधिक व्यक्तींनी या मोफत देवदर्शन यात्रेचा लाभ घेतला. पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, देवगड, रांजणगाव, आळंदी अशा विविध देवदर्शनाचा ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.



# पनवेलमध्ये 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा'

## ◆ उपक्रमाबाबत महापालिकेत सामाजिक संस्थांची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' उपक्रम राबविण्याबाबत महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण संबधित काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्थाच्या प्रतिनिधींची बैठक बुधवारी (दि. १४) महापालिकेच्या मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

या वेळी पर्यावरण विभाग उपायुक्त डॉ. वैभव विधाते, विभाग प्रमुख मनोज चव्हाण, स्वच्छता आणि घनकचरा विभागप्रमुख अनिल कोकरे, महापालिका कार्यक्षेत्रात पर्यावरण संबधित काम करणाऱ्या सुमारे २० हून अधिक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, महपालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणोशोत्सव साजरा करण्याच्यादृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमध्ये सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणपूरक गणेश मुर्ती, पर्यावरणपूरक आरास याचबरोबर पालिकेनी तयार केलेल्या सप्तसूत्रीवर भर देण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन या वेळी आयुक्तांनी केले.

या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते म्हणाले, महापालिकेने यावर्षी महापालिकेने 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा उपक्रम' राबविताना श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यापासूनच पर्यावरणाची कास धरली असून, शाडू मुर्तीला प्राधान्य, सप्तसूत्री, घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा, गणेशमूर्तीचे पर्यावरणपूरक विसर्जन व गणेशमूर्ती दान संकल्पना असे अभिनव उपक्रम महापालिका राबवित आहे.

यावेळी विविध संस्थाच्या प्रतिनिधींनी गणोशोत्सव पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या. या सूचनांचे आयुक्तांनी स्वागत केले. पर्यावरणपूरक गणोशोत्सव राबविण्यासाठी महापालिकेच्यावतीने मागील वर्षीप्रमाणे गणेश मुर्ती दान व कृत्रिम तलाव विसर्जन या संकल्पना राबविणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### 'बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा' उपक्रमांतर्गत महापालिकेने तयार केलेली सप्तसूत्री

*१) श्रीगणेशाची मूर्ती लाल मातीची किंवा शाडूची असावी.*
*२) पर्यावरपूरक वारसा नव्या पिढीला देत आपल्या घरातील लहानग्यांच्या हस्ते मातीची मूर्ती घडवून त्याचीच प्रतिष्ठापना करावी.*
*३) मूर्तींना शक्यतो नैसर्गिक रंगच लावावेत.*
*४) घरातील मखर, आरास, सजावट हे कापड, कागद किंवा फुलांचे करावे.*
*५) डीजे टाळूनआपल्या इष्टदेवतेची आराधना मंगलमय संगीताने कमी आवाजात करावी.*
*६) नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने घरीच एका मोठ्या ड्रममध्ये पाण्यात मंगलद्रव्ये घालून त्यामध्ये श्रींचे विसर्जन करावे.*
*७) गणेश विसर्जनाच्या वेळेस आणलेले निर्माल्य हे निर्माल्य कलशातच कागदी पिशवीतून टाकावे.*

## चिर्लेच्या उपसरपंचपदी भाजपच्या रोशनी मोहिते



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिर्ले ग्रुपग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाची निवडणूक झाली असून उपसरपंचपदी भाजपच्या रोशनी विश्राम मोहिते या शेकाप उमेदवाराचा पराभव करून विजयी झाल्या.

रंजिता जितेंद्र पाटील यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर चिर्ले ग्रामपंचायतीचे सरपंच सुधाकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. ही निवडणूक प्रक्रियेत शेकापचे ग्रामपंचायत सदस्य मेघनाथ कातकरी व भाजपच्या रोशनी विश्राम मोहिते यांनी अर्ज दाखल केले. सदर निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने व्हावी, अशी मागणी शेकापचे सदस्य आकाश टकले यांनी केली. त्याप्रमाणे ग्रामसेवक वैभव घरत यांनी प्रक्रिया पूर्ण केली व निवडणुकीत शेकापचे उमेदवार मेघनाथ कातकरी यांना पाच मते तर भाजपच्या उमेदवार रोशनी मोहिते यांना सात मते पडली.

शेतकरी कामगार पक्षाने मागील पंधरा दिवसांपासून भाजप व युतीच्या सदस्यांची मते फोडण्यासाठी अनेक प्रयत्न केले मात्र भाजप व मित्रपक्षाचे सदस्य एकजूट राहून रोशनी मोहिते यांना विजयी केले त्याबद्दल कामगार नेते जितेंद्र घरत यांनी विजयी उमेदवार तसेच सर्व युतीचे सदस्य यांचे अभिनंदन केले.

या वेळी युवा नेते समीर मढवी, माजी उपसरपंच हिराजी पाटील, ग्रामपंचायत सदस्य राजन घरत, राजेश पाटील, श्रीकांत पाटील, रंजिता पाटील, अश्विनी पाटील, प्राजक्ता गोंधळी, भाजपा व युतीचे कार्यकर्ते शशी पाटील, बाळू मोहिते, संदीप पाटील, राकेश मढवी, मेघनाथ मढवी, नंदेश घरत, मोतीराम मढवी, जितेंद्र पाटील, किशोर गोंधळी आदी उपस्थित होते.

## माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्यातर्फे मोफत झेंडावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार हर घर तिरंगा अभियान अंतर्गत पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्र. १८ मध्ये माजी नगरसेवक तथा भाजपचे पनवेल विधानसभा प्रमुख नितीन जयराम पाटील यांच्या तर्फे मोफत झेंडावाटप करण्यात आले.

तिरंगा झेंड्याचे वाटप नितीन जयराम पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, वीर सावरकर चौक तसेच नवीन पनवेल से.२ येथे करण्यात आले. या वेळी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी माजी नगरसेवक तथा पनवेल विधानसभा प्रमुख नितीन जयराम पाटील, माजी नगरसेविका नीता माळी, ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी प्रसाद हनुमंते, जिल्हा सदस्य उमेश इनामदार, शहर मंडल चिटणीस रूपेश नागवेकर, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, महिला मोर्चा प्रभाग अध्यक्षा संजीवनी खिल्लारे, स्वाती पवार, ज्योत्स्ना माळी, वैभवी गुरव, तबसुन खान, परेश बोरकर, नरेंद्र सोनवणे, राजा चव्हाण, मयूर चिटणीस, राजू सावंत, शैलेश कदम, विजय डिसोझा, प्रसाद कंधारे, बंटी भगत, रवी संदेपाल, विनीत मढवी, अमित पालकर, अजय तायडे, चैतन्य सकट आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## तिरंगा चित्राचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिमान तिरंगा उपक्रमांतर्गत एस नॅपकिन बुकेच्या संचालिका मानसी गोरखनाथ पोळ यांच्या संकल्पनेतून बुधवारी (दि. १४) ७८ फुट चित्रकला पेपर, ७८ विद्यार्थी एकात्मिक आदिवासीं विकास प्रकल्प (सुषमा पाटील विद्यालय, कामोठे) व एस नॅपकिन बुके व्यवस्थापन यांनी एकत्र येत तिरंगा चित्र साकारले.

तिच्या या उपक्रमाच्या सर्वच स्तरातून स्वागत व शुभेच्छा मिळाल्या. मोटिव्हेटर गोरखनाथ पोळ व आई सविता पोळ यांचे प्रोत्साहन तिला मिळाले. या वेळी सुषमा पाटील विद्यालयाच्या सीईओ यांनी अभिमान तिरंगा उपक्रमाचे कौतुक केले. माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी गोरखनाथ पोळ मॅनेजर जीवनदिप प्रकाशन नेहमीच प्रोत्साहन देतात, असे गौरवोद्गार काढले. मुलांना तिरंग्याचा कलरच्या महत्त्व अधोरेखित करत ॲड. नागेश हिरवे यांनी केले.



## तिरंगा पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूरांच्या मार्गदर्शनाखली खारघर मध्ये आयोजीत केलेल्या भव्य ११११ फुट तिरंगा पदयात्रेत जास्तीत जास्त नागरीकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांनी मंगळवारी (दि. १३) केले.



(छाया : अक्षय शार्दुल)

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या वतीने खारघरमध्ये भव्य दिव्य ११११ फुट तिरंगा पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यात प्रथमच सर्वात मोठी हि तिरंगा पदयात्रा असणार आहे. विकसित भारत वर लक्ष केंद्रित करून आपला भारत देश ७८वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहे. देशभरात १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा अभियान राबवले जात आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर स्वयं स्फूर्तीने राष्ट्रध्वज तिरंगा फडकवावा, यानिमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठी लिदान आणि योगदान देणाऱ्या ज्ञात अज्ञात सर्व स्वातंत्र्यवीरांचे स्मरण व्हावे, या हेतूने सदर अभियान राबवले जात असून स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता खारघर मधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ते उत्सव चौक अशा मार्गाने या भव्य दिव्य तिरंगा यात्रेला प्रारंभ होणार आहे.

या तिरंगा पदयात्रेत अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून अविस्मरणीय अनुभव आणि देशभक्तीच्या उत्सवात नागिरकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे. दरम्यान या यात्रेत संदर्भात माहिती देण्यासाठी खारघर मधील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात प्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होतो.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकविला. या वेळी त्यांच्या पत्नी शांताबाई भगत तसेच सुहास भगत उपस्थित होते.**

## भाजप अल्पसंख्यांक मोर्चातर्फे नवनाथ नगरमध्ये राष्ट्रध्वजाचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्यवीरांनी केलेल्या त्यागाच्या जोरावरच आज आपण भारतीय नागरिक स्वातंत्र्य अनुभवत आहोत. त्याग, शौर्य, प्रगती आणि सुजलाम सुफलामतेचे प्रतीक असणारा आपला राष्ट्रध्वज प्रत्येकाने घरोघरी लावलाच पाहिजे, असे रोखठोक प्रतिपादन सय्यद अकबर यांनी पनवेल येथे १४ ऑगस्ट रोजी केले. भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने हर घर तिरंगा अभियानांतर्गत नवनाथ नगर येथे घरोघरी राष्ट्रध्वजाचे वाटप करत असताना त्यांनी उपरोक्त उद्गार काढले.

भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांच्या संकल्पनेतून सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सय्यद अकबर पुढे म्हणाले की ज्या उत्साहाने तुम्ही १५ ऑगस्ट रोजी आपापल्या घरावरती झेंडा फडकवाल त्याच सन्मानाने सूर्य मावळल्यानंतर अथवा दुसऱ्या दिवशी सन्मानाने राष्ट्रध्वज सांभाळून ठेवा. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य संपल्यानंतर तो कुठेही फेकून त्याचा अवमान करू नका कारण असे केल्याने त्या तमाम स्वातंत्र्यवीरांचा अपमान होतो ज्यांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन आपल्याला हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या विविध लोकाभिमुख योजनांचे बाबत या वेळी सय्यद अकबर यांनी नवनाथ नगर वसाहती मधील नागरिकांना अवगत केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या लोकाभिमुख विकास कामांमुळे मिळणार्या सोयी सुविधांचे बाबत त्यांनी नवनाथ नगर मधील रहिवाशांशी चर्चा केली तसेच या ठिकाणी जीवन ज्योती फाउंडेशनच्या माध्यमातून चालविण्यात येणार्या बालवाडी उपक्रमातील लहानग्यांना सय्यद अकबर यांनी खाऊ आणि चॉकलेटचे मुक्तहस्ते वाटप केले. विशेष उल्लेखनीय म्हणजे महाराष्ट्र राज्यातील महिला सक्षमीकरण धोरणाला बळकटी देणारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमध्ये नवनाथ नगर वसाहती मधील भगिनींनी केलेल्या नोंदणीचा या वेळी सय्यद अकबर यांनी आढावा घेतला.

यावेळी त्यांच्या समावेत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या पदाधिकारी झरीना इसाक शेख उपस्थित होत्या. नवनाथ नगर मधील राष्ट्रध्वज वाटप कार्यक्रमाला सय्यद अकबर यांच्याबरोबर झरीना इसाक शेख, आसमा शेख, अबिदा शकील शेख, सोनाली महाडिक, कविता गुप्ता आदी प्रमुख मान्यवरांच्या समावेत नागरिक आणि लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

# उज्ज्वल भविष्यावर नजर

जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशाचा, भारताचा ७८वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२४ रोजी केवळ भारतातच नव्हे तर जगभरात जिथे-जिथे भारतीय आहेत, तिथे-तिथे अतिशय आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जाईल. अलीकडेच आपल्या देशाने स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी ओलांडली. ब्रिटिश राजवटीतून मुक्त होऊन भारत स्वतंत्र झाला, त्याच काळात स्वतंत्र झालेल्या आपल्या शेजारच्या काही राष्ट्रांची अवस्था पाहता आपल्या देशाची गेल्या पंच्याहत्तरहून अधिक वर्षांमधील वाटचाल निश्चितच समाधानाची म्हणावी लागेल.

**भारताच्या यापूर्वीच्या सर्वच पंतप्रधानांनी देशाला घडवण्यात आपापल्या परीने सुयोग्य योगदान दिले आहे. 'आणीबाणी'चा अपवाद वगळता या काळात देशातील लोकशाही व्यवस्था उत्तम रीतीने काम करीत राहिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यापासून त्यांनी 'सब का साथ, सब का विकास' ही घोषणा दिली आणि त्याबरहुकुम अत्यंत खंबीरपणे देशाचे नेतृत्व करीत देशाच्या प्रगतीच्या वाटेवरील प्रवासाला अधिक लक्षणीय असा वेग दिला. त्यांच्या विरोधकांनादेखील खरे तर हे मान्य करावेच लागेल. निवडणुकांच्या राजकारणामुळे विरोधक हे मान्य करीत नसले, तरी जनता मात्र आजही मोदींच्या नेतृत्वावर अलोट प्रेम करते आहे. मोदींच्या हातात देश सुरक्षित आहे यावर बहुसंख्य भारतीयांचा ठाम विश्वास आहे. सध्याच्या सरकारचा देशाच्या संविधानावर विश्वास नाही, त्यांना हुकुमशाही आणायची आहे असा कितीही विखारी प्रचार विरोधकांकडून सुरू असला तरी बहुसंख्य नागरिकांचा मोदींच्या नेतृत्वावरील विश्वास तिळमात्रही ढळलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी या वेळी सलग ११व्यांदा लालकिल्ल्यावरून देशाचा तिरंगा ध्वज फडकवतील. सर्वाधिक वेळा हा मान मिळालेल्या पंतप्रधानांच्या यादीत मोदी यांचे नाव आता तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. यापूर्वी पंडित जवाहरलाल नेहरू यांना १७ वेळा तर इंदिरा गांधी यांना १६ वेळा हा मान मिळाला आहे. अलीकडेच देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा विराजमान झाल्यानंतर प्रथमच मोदी लालकिल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनीचा संदेश देतील. यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याची संकल्पना 'विकसित भारत' ही आहे. या संकल्पनेंतर्गत स्वातंत्र्याच्या १००व्या वर्षी म्हणजेच २०४७ पर्यंत देशाला 'विकसित राष्ट्र' करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या वाटचालीत अर्थातच देशातील सर्वांना आपल्याला सोबत घ्यायचे आहे. याचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणून यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यात युवा, महिला आणि आदिवासींसमवेत चार हजार विशेष अतिथी सहभागी होणार आहेत. दीडशे महिला सरपंचांनादेखील या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यानिमित्ताने 'हर घर तिरंगा' अभियान सुरू करण्यात आले होते. आता या अभियानाला जनतेने उत्स्फूर्तपणे आपलेसे केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमा निश्चितपणे उंचावली आहे. भारताचे जागतिक घडामोडींमधील वर्चस्व वाढले असून, जगातील काही विकसित देश आर्थिक संकटांचा सामना करत असताना भारताकडे मात्र एक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते आहे. स्वातंत्र्यदिनी आपण नेहमीच आपल्या इथवरच्या वाटचालीचा आढावा घेऊन भविष्यातील वाटचालीचे उज्ज्वल चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतो. देशातील लोकांचे भारतीय लोकशाहीवर आणि राज्य घटनेवर निस्सीम प्रेम आहे. एकशे चाळीस कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या या देशात प्रत्येकाच्या मनात तिरंग्याला अतिशय आदराचे स्थान आहे. तिरंग्याचा अभिमान मनोमन जपणाऱ्या प्रत्येक देशप्रेमी नागरिकाला आजच्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा.**

# कशेडी घाटातील 'तो' डेंजरझोन पुन्हा पुन्हा खचतोय!



खबरबात
शैलेश पालकर

गेल्या महिनाभरात एकदा ऑक्सीजन सिलींडरची वाहतूक करणाऱ्या ट्रक ज्याठिकाणी दरी कलंडला आणि फोम बनविणाऱ्या केमिकलचा टँकर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर आडवा झाला. ते ठिकाण गेल्या १९ वर्षांपासून दरवर्षी खचत आहे. महामार्ग बांधकाम विभागामार्फत दरवर्षी लाखो रुपयांची मलमपट्टी केली जात असली तरी कायमस्वरूपी उपाययोजना केली जात नाही. गेल्या अनेक वर्षांपासून हा ७५ ते १० मीटर्सचा महामार्गाचा घाटरस्ता दरीकडे झेपावत असून डेंजरझोन म्हणून प्रसिध्द आहे. खासदार सुनील तटकरे यांनी याठिकाणी राज्याचे मंत्री, रायगडचे पालकमंत्री, विधानपरिषदेचे आमदार आणि गेल्या दोन वर्षांपूर्वी खासदार म्हणून पाहणी केली असून राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे अभियंत्यांनी आयआयटीच्या तंत्रज्ञांकडून उपाययोजना करून घेऊ असे उत्तर दिले होते. तरीही या डेंजरझोनच्या धोक्याकडे त्यांनी लक्ष दिले नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पोलादपूरपासून केवळ ९ कि.मी. अंतरावर असलेल्या कशेडी घाटातल्या 'डेंजरझोन'ची अवस्था 'रोज मरे त्याला कोण रडे? अशी असली तरी या 'डेंजरझोन'कडे सपशेल दूर्लक्ष केल्यास अथवा हा रस्ता नेहमीप्रमाणे खचल्यास ठेकेदारांसाठी तब्बल १९ वर्षे मलमपट्टी करून कुरण ठरत असल्याचा अनुभव पुढे भविष्यात कोकणवासियांचे मरणही ठरू शकत असल्याच्या धोक्याचे गांभीर्य लक्षात घेण्याची गरज आहे. कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गादरम्यान हा डेंजरझोन येत असल्याने या डेंजरझोनला कोणताही पर्याय दिसून येत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील एका कन्स्ट्रक्शन कंपनीद्वारे कशेडी घाटात पोलादपूरपासून ९ कि.मी. अंतरावर एका मोरीच्या बांधकामावेळी ब्लास्टींग करण्यात आल्याने या भागातील लालमाती कातळापासून सैल होऊन घाटरस्ता धोकादायक होण्याची चर्चा त्यादिवशीच अनेक स्थानिक वृत्तपत्रांमधून करण्यात आली होती, मात्र त्यावेळी कशेडी घाटाऐवजी आंबेनळी घाटाकडे वळविण्यात नॅशनल हायवे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना यश आले. त्यामुळे कशेडी घाटातील या मोरीच्या बांधकामात झालेल्या ब्लास्टींगच्या गंभीर प्रकाराकडे कायमचे दूर्लक्ष होऊन हे बांधकाम पूर्ण झाले. याठिकाणी ब्लास्टींग ऐवजी जेसीबीचा वापर केला गेला असता तर केवळ माती उकरून काढता आली असती मात्र, ब्लास्टींग केल्यामुळे सर्वच परिसरातील लाल माती कातळापासून सैल होऊन आजही घाटामध्ये लालमातीचे स्लायडींग होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. त्यामुळे हा सुमारे १०० मीटर्स लांबीचा नॅशनल हायवे आजतागायत डेंजरझोन म्हणूनच अस्तित्व दाखवून देत आहे.

आता कशेडी घाटात जिथे मोरीजवळ नॅशनल हायवे तब्बल अडीच फूट खोल खचला आहे आणि रस्त्याला भेगा गेल्या आहेत; त्याठिकाणी नॅशनल हायवे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रस्त्याची वाहतूक क्षमता तपासण्याची गरज निर्माण झाली असून याठिकाणी छोट्या गाडया अचानक खोलगट रस्ता आल्याने सात फूट उंचावरून झेपावताना दिसतात तर काही तिरक्या झालेल्या पाहण्यास मिळतात. केवळ खडी आणि लालमातीचे भराव करून हा खचणारा रस्ता पूर्ववत् होणार नसल्याने सध्या भाग कशेडी घाटाचा 'डेंजर झोन' झाला आहे. कशेडी घाटातील लॅण्ड स्लायडिंगवर उपाययोजना करण्यासाठी दहा वर्षांपूर्वी २५ ते २७ एप्रिल २०१२पर्यंत पावसाळ्यापूर्वी मेगाब्लॉक घेण्यात आला होता. पोलादपूर तालुक्यातील ओंबळीपासून रत्नागिरी जिल्हाहद्द रस्ता आणि काटेतळीतून करंजाडीपासून खेडपर्यंत रस्ता कशेडी घाटाला पर्यायी रस्ता म्हणून तालुक्यात उपलब्ध असताना महाड तालुक्यातील रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून लाईट वेट आणि लाईट मिडीयम वेट वाहनांची वाहतूक महाड तालुक्यातील राजेवाडीमार्गे विन्हेरे तुळशीखिंड नातूनगर खेड तर अवजड वाहनांची वाहतूक महाड तालुक्यातील वीर टोळ-आंबेत-म्हाप्रळ-मंडणगडमार्गे खेड अशी वळविण्याचे आदेश दिले गेले. याठिकाणी सुमारे १३ वेळा सलग भराव करूनही हा डेंजरझोन पुर्ववत् बिनधोक झाला नाही.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील २९ मोऱ्यांच्या बांधकाम आणि रूंदीकरणाच्या सुमारे एक कोटी ८७ लाख रुपयांच्या मंजूर कामामध्ये कशेडी घाटातील डेंजर झोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घाटातील सर्वांत मोठ्या मोरीचा समावेश करण्यात आला नव्हता. कशेडी घाटात २००५ रोजी मोठया प्रमाणात भूस्खलन होऊन सुमारे २४ दिवस वाहतूक बंद राहिली होती. त्यानंतर मेगा ब्लॉक घेऊनही दोन वेळा वाहतूक बंद ठेवली गेली, परंतु या मेगाब्लॉकच्या काळामध्ये केवळ पाचशे मीटर्स अंतरावर या डेजरझोनजवळच दगडखाण सुरू करून ब्लास्टींग करण्यात आले. येथे डबर, दगडभुकटीचा भराव करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने ठेकेदार चंदनानी यांच्याकडून करून घेण्यास सुरूवात केली.

याकामी भोगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरू करण्यात आलेल्या दगडखाणीस प्रारंभी तहसिल कार्यालयाने परवानगी दिली होती, मात्र भोगावच्या ग्रामसभेने या दगडखाणीवर हरकत घेताना घरे व इमारतींना हादरे बसून बोअरवेल विहिरींतील पाण्याची पातळी खोल जात असल्याचा ठराव तहसील कार्यालयाकडे दिल्याने ही परवानगी रद्द करण्यात आली. तरीदेखील राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांच्या देखरेखीखाली या कामासाठी ठेकेदाराची यंत्रणा सदर दगडखाणीत सुरूंगस्फोटाचा राजरोसपणे वापर करीत या 'डेंजरझोन'मध्ये भराव करीत राहिली.

रायगडचे पालकमंत्री असताना दोनवेळा तर खासदार असताना तीन वेळा खासदार सुनील तटकरे यांनी या डेंजरझोन परिसराला सातत्याने भेट दिली. प्रत्येकवेळी सुनील तटकरे यांनी सुचविलेल्या उपाययोजनांकडे अभियंत्यांनी 'हो सर' म्हणून केलेल्या दुर्लक्षामुळे डेंजरझोन रस्त्याचे अस्तित्व अबाधित राहिले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग महाडचे तत्कालीन प्रकाश गायकवाड यांच्याकडे यंदाच्या कामाबाबत माहिती मागितली असता यंदाचे कामही तात्पुरत्या स्वरूपाचे तातडीच्या उपाययोजनेसंदर्भात असले तरी नजिकच्या काळात 'आयआयटी' या नामांकित संस्थेमार्फत याठिकाणी कायमस्वरूपी उपाय करण्यासंदर्भात वनी येथील मंदिराच्या रस्त्याप्रमाणे मार्गदर्शन अथवा मदत घेण्यात येईल, अशी माहिती दिली आहे.

या संकेतांचे पुढे काय झाले याबाबत आता सार्वजनिक बांधकाम विभागालाही काहीच आठवत नसल्याचे दिसून आले आहे. दरवर्षी एकाच ठिकाणी शासनाचा कोटयवधी रूपयांचा चुराडा करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाने याठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे का टाळले गेले, याचे उत्तर केवळ ठेकेदारांसाठी कुरण निर्मिती असल्याचे दिसून आले.

## बदलते तंत्रज्ञान

# ...तर समजा तुमचा मोबाईल झालाय हॅक!

स्मार्टफोन हा आपल्या जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, ज्यात पर्सनल डेटापासून ते बँक लॉगिनच्या डिटेल्सपर्यंत सर्व गोष्टी असतात. जर फोन हॅक झाला तर तुमचं मोठं नुकसान होऊ शकतं. आज अशीच एक खास माहिती जाणून घेणार आहोत, ज्याच्या मदतीने युजर्स आपला मोबाईल कोण वापरत आहे हे सहज तपासू शकता.



अँड्रॉईड स्मार्टफोन्समध्ये एक खास फीचर आहे, ज्याच्या मदतीने तुम्ही हॅकर्स किंवा इतर कोणी गुपचूप तुमचं संभाषण ऐकत आहे की नाही हे ओळखू शकता. जेव्हा तुम्ही अँड्रॉईड स्मार्टफोनमध्ये कॅमेरा किंवा माइक एक्टिव्ह करता तेव्हा वर उजवीकडे एक मिनी आयकॉन दिसेल. तो ग्रीन लाईटच्या, डॉटच्या स्वरूपातदेखील येते.

अशा परिस्थितीत जर तुम्ही कॅमेरा किंवा माइकचा वापर केला नाही, त्यानंतरही कॅमेरा आणि माइकचा ग्रीन डॉट किंवा मिनी आयकॉन मोबाईल स्क्रीनवर दिसत असेल तर तुम्हाला धोका आहे. अशा स्थितीत माइक आणि कॅमेरा वापरणारे एप्स तुम्ही ताबडतोब शोधावे.

तुम्हाला एखादा संशयास्पद ॲप दिसल्यास तुम्ही ते त्वरित अनइन्स्टॉल करू शकता. यासाठी तुम्ही तुमच्या स्मार्टफोनचा फॅक्टरी डेटा रिसेटही करू शकता. अशा स्थितीत अनेक अनावश्यक ॲप्स मोबाईलमधून अनइन्स्टॉल होतील. तुमचा मोबाइल सुरक्षित ठेवण्यासाठी, तुमच्या मोबाइल ॲपच्या परमिशन नियमितपणे तपासत राहणे महत्त्वाचे आहे.

तुम्हाला कोणतेही संशयास्पद ॲप दिसल्यास ते ब्लॉक करा. अशाच तंत्रांचा वापर करून हॅकर्स तुमचे बँक तपशील चोरू शकतात. यानंतर ते तुमच्या बँक खात्यातून लाखो रुपये लुटू शकतात. त्यामुळे नेहमीच अलर्ट राहणं हे अत्यंत गरजेचं आहे. अशा प्रकारे फसवणूक झाल्याच्या अनेक घटना याआधी समोर आल्या आहेत.

हल्ली मोबाईवर वेगवेगळ्या लिंक्स येत असतात. त्याचप्रमाणे थेट कॉलही येतात. जर यापैकी कोणतेही तुमच्या परिचयाच्या व्यक्तीकडून आलेले नसेल तर आधी तुम्ही खात्री करा की, समोर कोण आहे. त्यानंतरच तुम्ही पुढचे पाऊल उचला; अन्यथा फसगत होऊ शकते.

# भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

भारतात स्वातंत्र्य दिन दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. सरकारी आणि खासगी कार्यालये तसेच बँका, शाळा आणि महाविद्यालये आणि देशातील इतर सर्व संस्थांसाठी ही राष्ट्रीय सुट्टी असते. यंदा देशाच्या स्वातंत्र्याचा ७७वा वर्धापन दिन आपण साजरा करीत आहोत.

दरवर्षी १५ ऑगस्ट हा दिवस भारतीयांसाठी अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. ही राष्ट्रीय सुट्टी असल्याने ध्वजारोहण समारंभानंतर सर्व प्रादेशिक, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील सरकारी कार्यालये बंद राहतात. व्यावसायिक दुकानेही बंद राहू शकतात किंवा ऑपरेटिंग तास कमी केले जाऊ शकतात, तर अत्यावश्यक सेवा सुरू असतात. देशभरातील शाळा आणि महाविद्यालये विद्यार्थी आणि पुरस्कार विजेत्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करतात. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. कलाकार त्यांच्या लपलेल्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्याची आणि ओळख आणि पुरस्कार मिळवण्याची ही संधी मिळवतात. काही ठिकाणी स्वातंत्र्यदिनी स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा गौरव केला जातो.



## निमित्त

भारतीय स्वातंत्र्य कायदा १९४७ हा १५ ऑगस्ट १९४७ रोजी युनायटेड किंगडम (यूके) संसदेने शासन केला. न्यायालयीन सार्वभौमत्व भारतीय संविधान सभेकडे हस्तांतरित करण्यात आले. किंग जॉर्ज सहावा, राणी एलिझाबेथ दुसरी हिचे वडील, संपूर्ण रिपब्लिकन संविधानात देशाचे प्रसारण पूर्ण होईपर्यंत राज्याचे नेतृत्व करत राहिले.

राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश प्रशासनापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारताने कठोर संघर्ष केला. भारत १५० वर्षांहून अधिक काळ ब्रिटीशांच्या ताब्यात होता. देशाला परकीय राज्यकर्त्यांपासून स्वातंत्र्य मिळवायचे होते. १८५७मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कायद्याच्या विरोधात, पहिले धर्मयुद्ध झाले. पुढे भारताच्या स्वातंत्र्याच्या मोहिमेला भारतीय विद्रोह, १८५७चे विद्रोह, महान बंड आणि भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध अशा अनेक नावांनी बोलावले गेले.

स्वातंत्र्य दिनाचे एक अतिशय महत्त्वाचे प्रतीक म्हणजे दिल्लीतील लाल किल्ला. हे ते ठिकाण आहे जिथे १५ ऑगस्ट १९४७ रोजी पहिल्या भारतीय पंतप्रधानांनी भारतीय ध्वजाचे अनावरण केले होते. भारताचे पंतप्रधान दरवर्षी स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावर भारतीय ध्वज फडकवतात. त्यानंतर पंतप्रधान भारतातील लोक, त्यांचे बलिदान, उपलब्धी, आव्हाने, तसेच सरकारच्या देशासाठी असलेल्या दूरदृष्टीची माहिती देऊन भाषण करतात. राष्ट्रध्वज फडकवणे हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून देशाच्या विकासाचे तसेच ब्रिटीश राजवटीच्या अंताचे प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे. लाल किल्ल्यावर होणारा कार्यक्रम हा भारत स्वतंत्र व्हावा म्हणून ज्यांनी आपले प्राण दिले त्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्याचा एक मार्ग आहे. सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा!

## क्लिक...क्लिक...!



**उरण : स्वातंत्र्य दिनानिमित्त कागदी ध्वज, शर्टला लावण्यात येणारे ध्वज तसेच विविध साहित्य बाजारात गांधी चौक, राजपाल नाका, आनंद नगर आदी ठिकाणी विक्रीस आले आहेत.** (छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# फास्ट फूडच्या ऐवजी 'हे' पदार्थ खा...!

तुमच्यापैकी अनेकांना मसालेदार, चविष्ट, चमचमीत पदार्थ खायला आवडतात. त्यात अनेक जण घरचे डाळ, भात नाही, पण बाहेरचा पिझ्झा, बर्गर, कोक आवडीने खातात. बाहेरच्या या खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात मीठ, मैदा, खाद्यरंगांचा वापर केला जातो. त्यामुळे विविध आजारांचा धोका वाढतो. त्याशिवाय अनेक जण जिमला जाण्यापूर्वी किंवा आल्यानंतर एनर्जी ड्रिंक्सचे सेवन करतात, जे की शरीरासाठी घातक असते, पण तरीही ते आपण खातो.



आपल्या आजूबाजूच्या परिसरातही अनेक फास्ट फूडची दुकानं पाहायला मिळतात. अनेकांच्या दिवसाची सुरुवात आणि शेवटही अशा फास्ट फूड खाण्याने होते, पण विचार करा की, जर तुम्ही एक महिना पिझ्झा, बर्गर, कोक असे बाहेरचे पदार्थ खाणे पूर्णपणे बंद केले, तर काय होईल? याच विषयावर आहारतज्ज्ञ सुश्री वीणा यांनी सविस्तर माहिती दिली ती जाणून घेऊ...

प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे अतिसेवन करणे हे प्रकारचे व्यसन बनू शकते. अशा वेळी आपल्या शरीराला नैसर्गिकरीत्या पोट भरण्यासाठी अधिक अन्न खाण्यास प्रवृत्त केले जाते, कारण बाहेरच्या पदार्थांमध्ये अशा काही गोष्टी टाकल्या जातात, ज्याने माणसाची खाण्याची इच्छा आणखी वाढते, असे स्टर व्हाइटफिल्ड हॉस्पिटल चीफ क्लिनिकल डाएटीशियन सुश्री वीणा यांनी सांगितले.

जेव्हा तुम्ही दीर्घ कालावधीसाठी बाहेरचे पदार्थ म्हणजे कोल्ड्रिंक्स पिझ्झा, बर्गर खाणे बंद करतात तेव्हा तुमचे शरीर या ॲडिटिव्हजपासून स्वत:ला डिटॉक्सिफाय करण्यास सुरुवात करते. डोकेदुखी, चिडचीड आणि थकवा अशी लक्षणे कालांतराने कमी होऊ लागतात. इतकेच नाही, तर व्यक्तीची शारीरिक ऊर्जा पातळी वाढते, पचनक्रिया सुधारते.

पांढऱ्या तांदळाच्या जागी तुम्ही ब्राउन राईस, सोडाऐवजी हर्बल चहा, रेग्युलर बटरऐवजी नट बटर, ग्रील्ड, बेक फूड आणि इतर अनेक प्रक्रिया केलेल्या पदार्थांऐवजी आरोग्यदायी खाद्यपदार्थांचे सेवन करू शकता. केकसारखे गोड पदार्थ घरीच चांगले पदार्थ वापरून बनवू शकता तसेच आईस्क्रीमच्या जागी फ्रोझन दही खाऊ शकता. याशिवाय घरच्या तयार केलेल्या सॅलडचा रोजच्या आहारात समावेश करणे हादेखील उत्तम आरोग्याचा भाग आहे, तर बाटलीबंद सोडा, कोल्ड ड्रिंक्सच्या जागी कोकम सरबत, लिंबू पाणी या पेयांचे सेवन करू शकता.

## निवडक

### मोरे महाविद्यालयात ग्रंथपाल दिन



**रोहे** : एम. बी. मोरे फाउंडेशनचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयात सोमवारी (दि.१२) ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती म्हणजेच ग्रंथपाल दिनानिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालय समितीने उपक्रमांचे आयोजन केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन केले. ग्रंथालयातील निवडक कादंबऱ्या, कथा, नाटके, आत्मचरित्रे, स्पर्धा परीक्षा तयारीची पुस्तके यांच्या प्रदर्शनात ११वी, १२वी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या वर्गातील विद्यार्थ्यांना निमंत्रित करून पुस्तकांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी पुस्तक वाचनाची प्रेरणा देणारे लघुपट द बुक आणि इन्स्पायरिंग रीडर्स: अ लिटिल लायब्ररी स्टोरी महाविद्यालयाच्या सभागृहात दाखवण्यात आले. कनिष्ठ आणि पदवी महाविद्यालयातील २५० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. ग्रंथपाल निर्मला थोरात आणि ग्रंथालय समितीतील विद्यार्थिनी प्रतिनिधी मुस्कान बेहेलीम यांनी उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले.

### माणगावात १७८ रुग्णांची तपासणी

**माणगाव** : माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१४) नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन १७८ रुग्णांची तपासणी करून ५० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबिर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.



# अलिबाग चौलमधील रस्ता झाला सुसाट

## रामेश्वर ते चौल चौकी काँक्रिट रस्त्याचे लोकार्पण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेला चौल रामेश्वर ते चौल चौकी रस्ता काँक्रिटीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले. या रस्त्याचा लोकार्पण कार्यक्रम नुकताच झाला. हा रस्ता आमदार महेंद्र दळवी यांच्या निधीतून पूर्ण करण्यात आला आहे.

गेली २० वर्षे दूरवस्था झालेला चौल रामेश्वर ते चौल चौकी या रस्त्याच्या दुरूस्ती व नूतनीकरणाची मागणी येथील ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांचेकडे केली होती. त्यानुसार आमदार महेंद्र दळवी यांनी या रस्त्यासाठी निधी उपलब्ध केला. रामेश्वर मंदिरातील श्रावणी सप्ताहानिमित्त आमदार महेंद्र दळवी यांना निमंत्रित करण्यात आले होते. या वेळी या रस्त्याचे लोकार्पणही करण्यात आले. काही महिन्यांत चौल ग्रामपंचायती अंतर्गत विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध केला असून भविष्यात उर्वरीत कामे पूर्ण करण्याचा मनोदय आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला.

चौल श्री रामेश्वर मंदिर येथे आदिती नाईक–दळवी, शिवसेना महिला जिल्हा संघटक संजीवनी नाईक यांचे स्वागत माजी सरपंच प्रतीक्षा राऊत, तनुजा घरत, सौ. ठाकूर आदींनी केले. श्री रामेश्वराचे दर्शन आमदार महेंद्र दळवी यांनी घेतले. या वेळी श्री रामेश्वर मित्रमंडळाचे वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी सद्गुरू पतसंस्थेचे चेअरमन प्रवीण राऊत, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी, प्रशांत शेणवईकर, जितेंद्र जाधव, रमेश वार्डे, महेंद्र घरत, तनुजा घरत, कार्यकर्ते उपस्थित होते.



## माथेरानमध्ये श्रमदानातून जपतायेत सामाजिक बांधिलकी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरतील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी लाकडांचा तुटवडा भासत असून येथील विद्युत दाहिनीदेखील बंद अवस्थेत आहे. याच अनुषंगाने शहरतील सर्व समाजबांधवांनी सामाजिक बांधिलकी जपत एकत्रित येऊन श्रमदान करून जंगलात पडलेली सुकी लाकडे गोळा केली आणि स्मशानभूमीत लाकडांचा डेपो तयार करण्यात आला.



माथेरानमधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी विद्युतदाहिनी व लाकडांचा वापर केला जातो. मागील काही वर्षांपासून विद्युतदाहिनी बंद आहे. यामुळे अंत्यसंस्कारासाठी लाकडांचा वापर केला जातो. सध्या सुक्या लाकडांचा साठा कमी झाला असल्याने येथील क्षत्रिय मराठा समाज, कोकण वासीय समाज, संत रोहिदास चर्मकार समाज, धनगर समाज, धोबी समाज, गुजराती समाज, वाल्मिक समाज, युवा रुखी समाज अशा सर्व समाज बांधवांनी बुधवारी (दि. १४) स्मशानभूमीत एकत्रित येऊन आजूबाजूच्या परिसरात पावसामुळे उन्मळून पडलेली सुकी लाकडे गोळा करून लाकडांचा

डेपो तयार केला. यासाठी त्यांना माथेरान नगरपालिका येथील हॉटेल असोसिएशन आणि माजी नगरसेवक तथा भाजप आदिवासी मोर्चा तालुकाध्यक्ष संदीप कदम यांनी विशेष सहकार्य केले. माथेरान भाजपने पुढाकार घेऊन सोशल मीडियाद्वारे आवाहन करून गावातील सर्वच समाजबांधवांना एकत्रित करून अशा समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

> **माथेरान हे अगदी छोटेसे गाव आहे. येथील सर्वच कामे मनुष्यबळाने केली जातात. अशीच काही कामे पुढाकार घेऊन स्वच्छेने सर्वांनी केलीत तर येथील अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात. यासाठी सर्वांच्या मदतीची गरज आहे.**
>
> **–प्रवीण सकपाळ, शहराध्यक्ष, भाजप**

## हिरवळ महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

विधी सेवा समिती महाड–पोलादपूर व वकील संघटना महाडतर्फे हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेजमध्ये सोमवारी (दि. १२)कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सह दिवाणी न्यायाधीश एच. एस. आदमाने, ॲड. अमितकुमार चांदोरकर, ॲड. पूर्वा हाटे, पोलिस उपनिरीक्षक गणेश भिलारे, वाहतूक पोलीस कॉंस्टेबल बल्लाळ, हिरवळ महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम उपस्थित होते. ॲड. अमितकुमार चांदोरकर यांनी विविध विषयांवर नियमितपणे जनजागृती करणे काळाची गरज आहे, असे मत व्यक्त केले.

पोलीस उपनिरीक्षक गणेश भिलारे यांनी विद्यार्थ्यांकडून वाहतुकीदरम्यान होणाऱ्या चुका व त्यासाठी कायद्याने होणाऱ्या शिक्षा याविषयी सांगितले. सहदिवाणी न्यायाधीश एच. एस. आदमाने यांनी रॅगिंगचे विविध प्रकार व शिक्षा यावर मार्गदर्शन केले.

## खालापूर येथे महसूल कर्मचारी, अधिकारी संवाद व प्रशिक्षण

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालयात महसूल पंधरवडानिमित्त महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा संवाद आणि प्रशिक्षण कार्यक्रम झाला.

सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी, शासकीय मदत, वैद्यकीय सुविधा, दिव्यांग तपासणी व प्रमाण पत्र वाटप,एक हात मदतीचा, सैनिक हो तुमच्यासाठी,सैनिक कल्याण कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन व मार्गदर्शन, ई–प्रणाली, पिक कापणी, युवा संवाद ईत्यादी कार्यक्रम राबविताना महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद व प्रशिक्षण हा कार्यालयीन कार्यक्रम तहसील कार्यालय खालापूर येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास महसूल नायब तहसीलदार विकास पवार, नायब तहसीलदार (सांगायो) मिलिंद तिरेकर उपस्थित होते. नायब तहसीलदारांनी महसूल कर्मचारी, तलाठी, शिपाई व कोतवाल यांच्या अडचणी समजून घेतल्या तसेच विविध प्रलंबित सेवा विषयक बाबी निकाली काढण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या. कर्मचारी यांचे सेवा पुस्तक अद्यावत करण्यात आले, अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यालयीन कामकाजाबाबत व संगणक प्रणाली त्याद्वारे चालणारे शासकीय कामकाज प्रणालीचा प्रभावी वापर यासंबंधी विषयासंदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रसंगी अशोक सुसलादे, संदेश पानसरे, श्रीनिवास खेडकर, कार्यालयीन कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी व कोतवाल उपस्थित होते.




**जाहिर सूचना**

डॉं. मिलिंद यशवंत नाडकर्णी यांचा पनवेल येथील ''श्री स्वामी समर्थ आणि श्री रामकृष्ण क्लिनीक'' लहान मुलांचा दवाखाना दिनांक १५ ऑगस्ट २०२४ पासून कायम स्वरुपी बंद राहणार आहे. याची नोंद घ्यावी.

- **डॉं. मिलिंद नाडकर्णी** :– (M.D. PAED)
- **डॉं. स्मिता नाडकर्णी** :– (M.B.B.S.D.C.H)

*** पत्ता ***
**१२७/४ लाईन आळी, एल.आय, सी, ऑफिसच्यामागे पनवेल ४१०२०६**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE (SECOND CALL)**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/ MHD/Tech/E-Tender-18/IInd Call/2024-25 Dtd.15.08.2024 **RFx** No.7000031499 | **Sub.:-**Second Call for SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2024-25 | Rs. up to 7,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-23/IInd Call/2024-25 Dtd.15.08.2024 **RFX No.** 7000031481 | **Sub.:-**Second Call for SRM E-Tender for AMC of Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | Rs.5,00,000/- (including GST + 1% Labour CESS) |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-24/IInd Call/2024-25 Dtd.15.08.2024 **RFX No.** 7000031455 | **Sub:-** Second Call for SRM E-tender for Electric tack welding at various locations under EHV Line Sub Division Mahad under EHV (O&M) Dn. Mahad. | Rs.16,45,135/- (Including Taxes |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST

Bid submission is from 15.08.2024 @ 00:00 hrs to 21.08.2024 @23:59Hrs for above tender For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn., Mahad**

**Government of Maharashtra**
Public Works Department P.W. Division, Mahad
Telephone No. 02145 222167
E-Tender Notice No. 27 (Open ONLINE) Year-2024-25
E-mail address:- mahad.ec@mahapwd.gov.in

Invitation of Request for Proposal (RFP) for Appointment of Private Architect. Structural Design Consultant and comprehensive Project Management Consultancy Services for CONSTRUCTION OF 100 BEDDED SUB DISTRICT HOSPITAL BUILDING at Mahad Tal-Mahad Dist- Raigad for selection of the Consultant to whom the Project may be awarded

The detailed Tender notice and Request for Proposal (RFP) can be viewed / downloaded from E-Procurement portal http:// mahatenders.gov.in. The detailed notice can also be viewed on www.mahapwd.gov.in. The last date of submission of bid shall be on 21.08.2024

The authority reserves the right to accept or rejected all/ any of the offers without assigning any reasons whatsoever. Conditional bid is not accepted.

**SD/-**
**Executive Engineer**
**P.W.Division**
**Mahad**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. पंढरीनाथ गोविंद पाटील व इतर यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – बेलवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| ३६ | ० पो. ख. | ० हे – २२ आर– ०० पॉ. ० हे – ०२ आर –५० पॉ. | ०३ – ८७ |
| | | ० हे – २४ आर - ५० पॉ. | |
| ४६ | ० पो. ख | ० हे – ४९ आर–०० पॉ. ० हे – ०७ आर–१० पॉ. | ०५ – ६२ |
| | | ० हे – ५६ आर– १० पॉ. | |
| ५१ | ० पो.ख. | ० हे – ०२ आर –०० पॉ. ० हे – ०० आर –५० पॉ. | ० – ०६ |
| | | ० हे –०२ आर –५० पॉ. | |
| | **एकूण क्षेत्र** | ० हे – ८३ आर -१० पॉ. | |

सदरवील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहीवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '१४ दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. शैलेश मनोहर पांचाळ**
**पत्ताः ऑफीस नं.०८, अंबिका आर्केड, लोखंडी पाडा,पनवेल कोर्टाजवळ, पनवेल - ४१०२०६, मो. ९१३६०४९७८८**

**ठि.: पनवेल**
**दि. 15/08/2024**

**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा**
(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता –नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र–४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad (MH)-४००७०४

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स–022-27222132, | ई–मेल–kvkaranja@gmail.com, | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE H 27241501112 |

वैबसाइट – https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**
**URGENTLY REQUIRED**

केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष 2024-25 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **(अंग्रेजी,अर्थशास्त्र, गणित, भूगोल)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |

**साक्षात्कार दिवस :** 21.08.2024 **(बुधवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM

**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल द[illegible] एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/–**
**प्राचार्य**
**केवि एन. एडी करंजा**
**प्राचाय/Principal**
**केंन्द्रीय विद्यालय/Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / N-D Karanja**
**जिला–रायगढ़ (महाराष्ट्र)/Dist.-Raigad (MH.)**

**Government of Maharashtra**
Public Works Department P.W. Division, Mahad
Telephone No. 02145 222167
E-Tender Notice No. 28 (Open ONLINE) Year-2024-25
E-mail address:- mahad.ec@mahapwd.gov.in

Invitation of Request for Proposal (RFP) for Appointment of Private Architect. Structural Design Consultant and comprehensive Project Management Consultancy Services for CONSTRUCTION OF 200 BEDDED SUPER SPECIALITY HOSPITAL KEMBURLI at Mahad Tal-Mahad Dist- Raigad for selection of the Consultant to whom the Project may be awarded

The detailed Tender notice and Request for Proposal (RFP) can be viewed / downloaded from E-Procurement portal http:// mahatenders.gov.in. The detailed notice can also be viewed on www.mahapwd.gov.in. The last date of submission of bid shall be on 21.08.2024

The authority reserves the right to accept or rejected all/ any of the offers without assigning any reasons whatsoever. Conditional bid is not accepted.

**SD/-**
**Executive Engineer**
**P.W.Division**
**Mahad**

## निवडक



### कोपर शाळेत ध्वजवंदन

**पनवेल :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत आयोजित हर घर तिरंगा उपक्रम बुधवारी (दि. १४) पनवेल तालुक्यातील रा.जि.प. प्राथमिक शाळा कोपर (गव्हाण) येथे राबविण्यात आला. या वेळी ध्वजारोहण इंदुबाई म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायत सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, वामन म्हात्रे, साईनाथ मोकल, आनंदी घरत, मनिषा घरत उपस्थित होते.

### भेंडखळ ग्रामपंचायतीवर राष्ट्रध्वज

**उरण :** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत मंगळवारी (दि. १३) उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. ध्वजारोहण उपसरपंच अभिजित देवानंद ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायतच्या सरपंच मंजिता पाटील, सदस्य दीपक ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य लिलेश्वर भगत, अजित ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सोनाली ठाकूर, स्वाती पाटील, स्वाती घरत, शितल ठाकूर, प्राची पाटील, अक्षता ठाकूर, संगीता भगत व सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व ग्राम विकास अधिकारी किरण केणी, वरिष्ठ लिपिक दिपाली मते, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण सर, विकास म्हात्रे, अनिरुद्ध पाटील यांच्यासह प्राथमिक परिषद शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.



# देशभक्तीसह पर्यावरणशील संदेश

## नवी मुंबईत इकोफ्रेंडली तिरंगा रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण देशभरात ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत राबविण्यात येणा-या 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. यामध्ये विभागाविभागात तिरंगा रॅली, तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आलेल्या असून त्यामध्ये विद्यार्थी, महिला, युवक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

अशाच प्रकारचा ई – बाईक आणि सायकलसह इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीचा एक अभिनव उपक्रम मुख्यालय स्तरावर राबविण्यात आला. यामध्ये ५० हून अधिक नागरिक व स्वच्छताकर्मी यांनी आपल्या सायकल तसेच युलू ई बाईक घेऊन सहभागी होत 'भारतमाता की जय' या सोबतच स्वच्छतेच्या अनुषंगाने 'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत ही रॅली यशस्वी केली.



घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व क्रीडा आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे – पाटील यांनी झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ केला. या वेळी बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या महानगरपालिकेच्या वुमेन आयकॉन रिचा समित उपस्थित होत्या.या इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीचा संदेश प्रसारित करण्यासोबतच ई – बाईक, सायकल अशा पर्यावरणपूरक वाहनांचा नागरिकांनी वापर वाढवावा व प्रदूषण रोखून पर्यावरण संरक्षणात आपला हातभार लावावा हा संदेश प्रसारित करण्यात आल्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी सांगितले.

### स्वच्छतेची शपथ

या वेळी सामुहिकरित्या तिरंगा प्रतिज्ञा तसेच स्वच्छतेची शपथ घेऊन रॅलीची यशस्वी सांगता करण्यात आली. उपस्थितांनी तिरंगा सेल्फी स्टँडवर मोठ्या प्रमाणात सेल्फी छायाचित्रे काढली तसेच घरोघरी तिरंगा कॅनव्हासवर स्वस्वाक्षरी करून अभियानात सहभाग नोंदविला. महापालिका मुख्यालय इमारतीपासून नेक्सस मॉलपर्यंत काढण्यात आलेल्या या इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीत नवी मुंबईतील अनेक सायकलप्रेमी उत्साहाने सहभागी झाले होते.



**पनवेल : हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष तथा गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत यांनी त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकविला. या वेळी सुहास भगत आणि सोहम भगत उपस्थित होते.**

# बीसीटी विधी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन मूट कोर्ट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉच्या मूट कोर्ट सोसायटीतर्फे आंतरमहाविद्यालयीन मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमामुळे कायद्याच्या विद्यार्थ्यांना त्यांचे कायदेविषयक ज्ञान व वकिली कौशल्य दाखवण्यासाठी एक समृद्ध व्यासपीठ उपलब्ध झाले. मूट कोर्ट सोसायटीच्या प्रभारी सहाय्यक प्रा. अपराजिता गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

ह्युमांशू मेश्राम (द्वितीय वर्ष एलएलबी) यांच्या सुत्रसंचालनाखाली झालेल्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे डॉ. विनायक एच. विश्वास, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ विभाग, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी अभ्यासपूर्ण भाषण करून भावी वकिलांच्या कायदेविषयक कौशल्याला आकार देण्यासाठी मूट कोर्ट स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित केले. बी.ए.एल. एल.बी., आणि एल.एल.बी.अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या एकूण १८ संघांनी या स्पर्धेत भाग घेऊन कायदेविषयक संशोधन व युक्तिवादातील आपले कौशल्य अधोरेखित केले. गोपनीयतेचा अधिकार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या गुंतागुंतीच्या मुद्द्यांभोवती केंद्रित असलेल्या या वादग्रस्त समस्येने सहभागींना समकालीन कायदेशीर वादविवादांमध्ये खोलवर गुंतण्याचे आव्हान दिले. ही स्पर्धा प्राथमिक, उपांत्य व अंतिम अशा तीन फेऱ्यांमध्ये पार पडली असून प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून सहाय्यक



प्रा.डॉ.ममता गोस्वामी, अॅड. सुयश बारटक्के, सहाय्यक प्रा.रवनिश बेक्टर व अॅड.अस्मिता मिश्रा यांच्यासह सहाय्यक प्रा.श्रीमती अनम मेहेंदीकर यांचा समावेश होता. तसेच जीईएस लॉ कॉलेजच्या सहाय्यक प्राध्यापिका अमृता सूर्यवंशी ,बी ए एल एल बी समन्वयक सहाय्यक प्रा. धनश्री कदम यांनी सेमीफायनल फेरीसाठी परीक्षक म्हणून तर अंतिम फेरीसाठी परीक्षक म्हणून के. सी.लॉ कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. आशिष बोरसे व प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांनी भूमिका बजावली. त्यांनी उपस्थितांची सखोल तयारी व प्रेरक युक्तिवादाचे कौतुक केले.

न्यायाधीशांनी विशेष अभिप्राय दिला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे कायदेशीर तर्क आणि न्यायालयीन शिष्टाचार सुधारण्यास मदत झाली. स्पर्धेतील स्मारकांचे परीक्षक पद सहाय्यक प्रा.राघव शर्मा यांनी काटेकोरपणे झाले.

कार्यक्रमाचा समारोप प्रमुख पाहुणे डॉ. आशिष बोरसे सर व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सूत्रसंचालन मृणाल पटेकर व दिशा ढोणे यांनी केले. या स्पर्धेत करुणा गोस्वामी, सुप्रिया मिश्रा, केतकी कांबळे पाचव्या वर्षाचा (बीए एलएलबी) संघ विजेता ठरला, तर ईशा रहाणे, यशिनी नाईक, अवंतिका गावंड चौथ्या वर्षाचा (बीए एलएलबी) उपविजेता ठरला, तर भूषण पाटील, वंदना जाधव, कामिनी पाटील यांनी द्वितीय उपविजेतेपद (द्वितीय वर्ष एलएलबी) पटकावले. सहाय्यक प्रा संग्राम पवार यांच्या अथक प्रयत्नांमुळे तसेच मूट कोर्ट सोसायटी व स्टुडंट कौन्सिल सदस्यांच्या सक्रिय सहभागामुळे स्पर्धा सुरळीत झाली. सहाय्यक प्रा अपराजिता गुप्ता यांनी प्राचार्य, प्रमुख पाहुणे, प्राध्यापक, सहभागी आणि संपूर्ण स्वयंसेवक संघाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षणाचा अनुभव तर मिळालाच, शिवाय विधी शिक्षणातील उत्कृष्टतेला चालना देण्याच्या महाविद्यालयाच्या बांधिलकीलाही बळ मिळाले.

# संगीत मैफिलीत पनवेलकर मंत्रमुग्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'हर घर तिरंगा घर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत मंगळवारी (दि.१३) देवकी मीडिया प्रस्तुत ऐ वतन तेरे लिये– संगीत की शाम, देश के नाम या बहारदार देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सायंकाळी ५ वाजता करण्यात आले होते.



या वेळी उपायुक्त कैलास गावडे, बाबासाहेब राजळे, संतोष राजळे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, मुख्य लेखापरिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खर्गे, पाणीपुरवठा अभियंता विलास चव्हाण, प्रकाश गायकवाड, राजेश डोंगरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संगीत संयोजक साहिल रेळेकर यांचे स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमात झी सारेगमप फेम गायिका मिथिला माळी, सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अमृता दहीवलकर, शिरीष कांबळे व सतिष भानुशाली यांनी बहारदार देशभक्तीपर गीते सादर केली. तर निवेदक आर जे अमित काकडे यांनी स्वातंत्र्याचा इतिहास उलगडताना प्रेक्षकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमात नामवंत वादक विकी आढाव, साहिल रेळेकर, आशिष महाडीक, अभिषेक तिरलोटकर, जयंता बगाडे, अभिषेक नांदगावकर, नितीन भगत, रमेश काळे यांची उत्तम साथ लाभली. तर ध्वनी संयोजन अनिल चौधरी, व्हिज्युअल्स आणि ग्राफिक्स डिझायनर जितेंद्र वागधरे, प्रकाशयोजना राजू तांबे यांनी केली.

# तबलागुरू विनायक प्रधान यांना विद्यार्थ्यांकडून गुरुवंदना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तबलागुरू विनायक प्रधान यांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'गुरुवंदना' हा कार्यक्रम केला. पनवेल कल्चरल असोसिएशनच्या सभागृहात हा सोहळा झाला.

या कार्यक्रमाला शास्त्रीय गायक पं. मिलिन्द गोखले, नंदकुमार कर्वे, नागनाथ पाटील, एकनाथ ठाकूर, तबलावादक किशोर पांडे, सासवडे सर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी विनायक प्रधान यांच्या विद्यार्थ्यांनी सांघिक तबला वादन सादर केले. या वेळी ओजस्विनी ओक हिचे संवादिनीवादन तसेच मोनालिसा सामंता आणि संदिप वीरकर यांचे गायन झाले. त्यांना महेश घाटे यांनी संवादिनी व धवल कुंटे यानी तबलासाथ केली. संतोष तारे यानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्रीधर सप्रे यांनी ध्वनीसंयोजन केले.

किशोर पांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुरुंचे महत्व विशद केले आणि ही गुरूशिष्य परंपरा अखंड जोपासण्याचे आवाहन केले.

# मत्स्यशेतीच्या पद्धतीवर कार्यशाळा

**खारघर : प्रतिनिधी**

मत्स्य शेतीच्या आधुनिक पद्धतीचा अवलंब करून गोड्या पाण्यातील मत्स्यशेती ही काळाची गरज आहे मत असे वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राचे डॉ. सुरेश नाईक यांनी पनवेल येथे मांडले. शहरातील खार जमीन संशोधन केंद्रात नुकताच मत्स्यशेतीच्या आधुनिक पद्धती या विषयावरती तीन दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम झाला या वेळी ते बोलत होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात मुंबई, पनवेल, नाशिक, सिंधुदुर्ग, सांगली तसेच मराठवाड्यातून शेतकरी व उद्योजक उपस्थित होते. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण विद्यापीठ, दापोली अंतर्गत मत्स्य उपकेंद्र, पनवेल येथे कार्यरत आहे. या प्रशिक्षणामध्ये मध्ये भारतीय प्रमुख कार्प मत्स्य संवर्धन, बायोफ्लोक मत्स्य




संवर्धन, तिलापिया संवर्धन, माशांचे प्रजनन आणि संवर्धन, माशांचे रोग आणि निदान, माती आणि पाणी व्यवस्थापन, कृत्रिम खाद्य आणि खाद्य व्यवस्थापन, पिंजरा पद्धतीने माशांचे संवर्धन, मत्स्य प्रकल्प अहवाल आणि अर्थशास्त्र या विषयांवर विस्तृत मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्राचे प्रमुख डॉ. शशिकांत मेश्राम यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मत्स्यशेती करण्याचे आवाहन केले. मत्स्य शेती करताना घेतलेल्या प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून व्यावसायिक स्तरावर मत्स्यव्यवसाय करण्याचे आवाहन केंद्राचे मत्स्यशास्त्रज्ञ तथा प्रशिक्षण समन्वयक डॉ. विवेक वर्तक यांनी प्रशिक्षणार्थींना आवाहन केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुरेश नाईक, डॉ. शशिकांत मेश्राम, डॉ. विवेक वर्तक, डॉ. भरत यादव, डॉ. प्रवीण सपकाळे, डॉ. शार्दुल गांगण,रवींद्र बोंद्रे आदी उपस्थित होते.

# 'विद्याभवन'चा माजी विद्यार्थी मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन संकुलाच्या मराठी आणि सेमी इंग्लिश माध्यमाचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा विद्याभवन सभागृहात कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या उपस्थितीत झाला.

२००४ ते २०१९पर्यंत झालेल्या एसएससी बॅचच्या विद्यार्थ्यांना या वेळी आमंत्रित करण्यात आले होते. काही माजी विद्यार्थ्यांनी वर्गात बसून तर काहींनी मैदानात सांघिक खेळ खेळून बालपण पुन्हा अनुभवले. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणातून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

शाळेतील व परिसरातील अनाथ, होतकरू आणि गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांसाठी निधी गोळा करण्याची संकल्पना अनेक माजी विद्यार्थी मांडली. तसेच शाळेच्या रौप्य महोत्सवी पुढील वर्षात महामेळावा व बॅच नुसार स्नेहसंमेलन घेतले जावे, अशी विनंती अनेक माजी विद्यार्थ्यांनी आयोजकांना केली. शिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी शाळेत झालेले नवे बदल, शाळेच्या नवीन गौरवास्पद गोष्टींची उपस्थितांना माहिती दिली. कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी माजी विद्यार्थी मेळाव्याचे उद्दिष्ट, विद्यार्थी आणि शिक्षकांनी आतापर्यंत केलेल्या कामगिरीची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

संध्याकाळी झालेल्या या कार्यक्रमास जवळपास दोनशे माजी विद्यार्थी उपस्थित होते. या मेळाव्यास मुख्याध्यापक गोरख कदम, सुवर्णा मिसाळ, माजी मुख्याध्यापक शिवाजी माळी, पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक, तत्कालीन शिक्षक सोनल मोरे व रेखा घोडे आणि विद्यार्थी उपस्थित होते.






## श्रावणाच्या धारा

श्रावणाच्या धारा आल्या, सृष्टीला ह्या भिजवाया
कळ्या फुले फुलवाया, सण साजरे कराया

श्रावणाचे सोमवारी, भावे पुजावा शंकर
शिवव्रत जो जो धरी, पुण्य जमवी अपार

श्रावणी मंगळवारी, पूजी मंगळागौरिला
करूनिया जागरण, जागवते अशी गौर

बुधवारी गुरुवारी, बुध बृहस्पती पूजा
वाही आघाड्याची पाने, नेवैद्याला करी खीर

श्रावणात शुक्रवारी, पूजी जीवती देवीस
नैवेद्याला पुरणाच्या, पोळ्या करी भरपूर

श्रावणात शनिवारी, करी शनीचे पूजन
व्रत करी मनोमन, घेती मारुतीचा वर

श्रावणात रविवारी, करी आदित्य पूजन
होता रवी तो प्रसन्न, देई दर्शन ते थोर

श्रावणात हर तिथी, होते सणांनी साजरी
होती उत्साहे साजरे, श्रावणात हर वार

करी कहाण्या वाचन, तया वाचता ऐकता
त्यातुनिया बोध घेता, कळे जीवनाचे सार



–दिवाकर वैशंपायन, पनवेल

# दुलीप ट्रॉफीसाठी चार संघ लढणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफीच्या नवीन हंगामासाठी संघ जाहीर करण्यात आले आहेत. ५ सप्टेंबरपासून सुरू होणार्‍या या स्पर्धेत एकूण चार संघ सहभागी होत आहेत. बीसीसीआयने सर्व संघ आणि कर्णधारांची घोषणा केली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीही या स्पर्धेत खेळतील अशी अपेक्षा होती, पण त्यांची नावे कोणत्याही संघात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. इतकेच नाही तर आणखी काही खेळाडू आहेत, जे सतत टीम इंडियासाठी खेळत आहेत, पण त्यांची नावे दुलीप ट्रॉफीसाठी निवडण्यात आलेल्या संघात नाहीत.

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली दुलीप ट्रॉफीमध्ये खेळताना दिसणार असल्याची चर्चा होती कारण भारतीय संघाकडे सध्या एकही मालिका नाही. भारत आणि बांगलादेश यांच्यात १९ सप्टेंबरपासून पहिली कसोटी खेळली जाणार आहे, त्याआधी हे खेळाडू दुलीप ट्रॉफी खेळू शकले असते, त्यांना सामन्याचा सरावही मिळाला असता, मात्र आता संघांची घोषणा झाली असून रोहित आणि विराट कोहली दुलीप ट्रॉफी खेळणार नाही.

याशिवाय जसप्रीत बुमराह, रविचंद्रन अश्विन, संजू सॅमसन, युजवेंद्र चहल, शार्दुल ठाकूर आणि हार्दिक पांड्या यांचाही संघात समावेश करण्यात आलेला नाही. या खेळाडूंशिवाय टीम इंडियाचे अनेक स्टार खेळाडू दुलीप ट्रॉफीमध्ये दिसणार आहेत. ज्यामध्ये ऋषभ पंत, रवींद्र जडेजा, केएल राहुल, मोहम्मद सिराज, इशान किशन, सर्फराज खान, ऋतुराज गायकवाड, श्रेयस अय्यर, मयंक अग्रवाल, रियान पराग, ध्रुव जुरेल, शिवम दुबे, तिलक वर्मा, आवेश खान, यशस्वी जैस्वाल आणि मुकेश कुमार यांचा समावेश आहे.

या वेळी बीसीसीआयने दुलीप ट्रॉफीचा फॉरमॅट बदलला आहे. याआधी ही देशांतर्गत स्पर्धा झोनल फॉरमॅटमध्ये खेळवली जात होती, मात्र आता यामध्ये चार संघ सहभागी होणार आहेत. आता या स्पर्धेत इंडिया-ए, इंडिया-बी, इंडिया-सी आणि इंडिया-डी असे चार संघ खेळणार आहेत. या सर्व संघांची घोषणा करण्यात आली आहे.

# एशियन बॉडीबिल्डिंग स्पर्धेत पोलीस निरीक्षक सुभाष पुजारींना सिल्वर मेडल



**पनवेल : वार्ताहर**

५६वी एशियन बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिप बाथम इंडोनेशिया येथे घेण्यात आल्या. या बॉडीबिल्डिंग स्पर्धेमध्ये सुभाष पुजारी पोलीस निरीक्षक यांनी ८० किलोवरील गटात सिल्वर मेडल मिळविले.

इंडियन बॉडीबिल्डिंग अँड फेडरेशनच्या वतीने त्यांची भारतीय संघातून निवड करण्यात आली होती. सुभाष पुजारी हे या स्पर्धेसाठी दररोज सहा तास मिस्टर ऑलिम्पिया सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत होते. या स्पर्धेसाठी २८ देशातील संघांनी व ३४५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी त्यांना चेतन पाठारे वर्ल्ड बॉडीबिल्डिंगचे सेक्रेटरी विक्रम रोठे, वर्ल्ड बॉडीबिल्डिंग लिगल अॅडव्हायझर, पत्नी रागिणी पुजारी, आनंद गुप्त, विवेक गुप्ता, राइनोमाइट क्लिनिक अंधेरीचे डॉ. कनिष्क जैन व डॉ. असीम माथन, सुदर्शन खेडकर, ऋषी पेणकर, समीर दाभेलकर, सागर माळी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# इंडिया ओपन शॉटगन स्पर्धेत मूसा मेहबूब काझी याला सुवर्णपदक




**नवीन पनवेल :** ११ ते १३ ऑगस्ट दरम्यान पटियाला पंजाब येथे झालेल्या ऑल इंडिया ओपन कॉम्पिटिशन शॉटगन स्पर्धेमध्ये सिद्धांत रायफल आणि पिस्टल शूटिंग क्लब रायगडचा नेमबाज मूसा मेहमूद काझी यांनी महाराष्ट्र रायफल संघटनेचे प्रतिनिधित्व करीत सुवर्णपदकाची कमाई केली आहे.

स्पर्धेत सिद्धांत रायफल क्लबचे नेमबाज मुसा मेहमूद काझी, साईम झुबेरखान देशमुख व आदित्य राजेश यादव या रायगड जिल्ह्याच्या नेमबाजांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत १००हून स्पर्धकांनी संपूर्ण भारतामधून सहभाग घेतला होता, परंतु मूसाने अचूक नेम धरत सुवर्ण पदकावर आपले नाव कोरून महाराष्ट्राला सुवर्ण पदकाची कमाई करून दिली व ६७व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे, तसेच आदित्य यादव ह्याची ही राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्यावर सर्वच स्थरावरून अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सुरेश आचरेकर स्मृती चषकाची अनाहिता महाजन मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित बीओबी कप विविध आठ वयोगटातील बुद्धिबळ स्पर्धेमध्ये अनाहिता महाजनने सहा वर्षांखालील गटात सर्व सामने जिंकले आणि समाजरत्न स्व. सुरेश आचरेकर स्मृती चषक पटकाविला. या चिमुकलीचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

बँक ऑफ बडोदा, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना सहकार्यीत ६ ते १४ वयोगटातील बुद्धिबळ स्पर्धेमधील सर्व साखळी पाच सामने जिंकणार्‍या सर्वांत लहान सबज्युनियर बुद्धिबळपटूचा विशेष पुरस्कार अनाहिताने जिंकला. तिला क्रीडा संघटक नामदेव घाग, क्रीडापटू चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले.




बीओबी कप बुद्धिबळ स्पर्धेत मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यातील १५८ शालेय खेळाडूंनी परेल येथील आरएमएमएस सभागृहात रंगतदार लढती दिल्या.

६ वर्षांखालील गटात आक्रमक खेळ करीत सामने झटपट जिंकण्याचे बहुतांश खेळाडूंनी डावपेच रचले. अनाहिता महाजनने रीयांश कलानी, कियान पाटकर, वियोना जैन व अबीर अगरवाल यांच्या विरुध्द जलद विजय मिळविले. निर्णायक पाचव्या फेरीत मात्र अपराजित इवान दुबे विरूद्ध खेळतांना अनाहीताला सावध खेळ करावा लागला.

अखेर १९व्या मिनिटाला इवान दुबेला शह देत अनाहिता महाजनने बाजी मारली आणि पाचही सामने जिंकून सुरेश आचरेकर स्मृती चषक पटकाविला.

राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धा

# काजल कुमारी, महम्मद घुफ्रान यांना प्रथम मानांकन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन आयोजित आणि सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट दादर यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या ५८व्या सिनियर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरीत मुंबईच्या महम्मद घुफ्रान याला, तर महिला एकेरीत मुंबईच्या काजल कुमारीला प्रथम मानांकन देण्यात आले आहे.

दादर येथील सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूटमध्ये गुरुवार (दि. १५)पासून ही स्पर्धा खेळली जाणार आहे. पुरुष व महिला सांघिक तसेच वयस्कर पुरुष एकेरी गटातील सामन्यांनी पहिल्या दिवशी स्पर्धेस सुरुवात होईल. सामन्यांचे थेट प्रक्षेपण महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्यूब चॅनलवरून करण्यात येणार आहे.





नवीन इमारतीमध्ये पूर्ण साहित्यासह चालू स्थितीत असलेले हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क क्र.: ७३०३१८४८३३

पत्ता : सेक्टर - ४, गणेश नगर, करंजाडे, पनवेल (रायगड) ४१०२०६



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com